RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 September 2015 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 September, 2015

# अजायब ❁ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : तीसरा | सप्टेंबर २०१५




सतगुरूंचे तेजोमय चरण (सत्संग) 5

सावन दयालु ने रिमझिम लाई (प्रश्नोत्तरे) 21

अनमोल वचन (संदेश) 33

धन्य अजायब (कार्यक्रमांची माहिती) 34


मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.


सोहणे सतगुरु दा, अज जन्म दिहाड़ा ऐ,
जन्म दिहाड़ा ऐ, भागां नाल आया ऐ,
आपले महान गुरू परमसंत अजायब सिंह जी महाराजांच्या
पवित्र जन्मदिवसाच्या सर्व संगतला हार्दिक शुभेच्छा.

# सतगुरूंचे तेजोमय चरण

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी,
संत बाणी आश्रम, सॅनबॉर्नटन, अमेरिका – २३ जुलै १९९६

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी या गरीब आत्म्यावर कृपा केली, त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली. आपल्या समोर स्वामीजी महाराजांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे. स्वामीजी महाराज या वाणीत समजावतात की आपण संतचरणी नमस्कार कसा करावा? संतांचा रोख अंतर्यातील तेजोमय चरणांकडे असतो. परंतु आपणांस बाह्यजगात जर सतगुरूंचे चरण प्राप्त झाले नाहीत, तर ते अंतर्यात आपणांस प्राप्त होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुलसीसाहेब सांगतात:

***छिन्न छिन्न सुरत संभाल लार दिरके रहो। तन मन दर्पण मान सार सिर से गहो।***
***लगन लगे लख सार तब पाया। हाँ रे सन्त चरन की धूड़ नूर दरसाया।।***

आपण प्रेमाने सांगता,''तुम्ही संतांनी दिलेल्या नामाचे स्मरण वारंवार करीत आपले लक्ष तिसऱ्या तिळावर एकाग्र करा. तेथे सतगुरूंचे तेजोमय चरण प्रगट होतील. सर्व संतांनी या चरणांचा उल्लेख केला आहे, तिथपर्यंत पोहोचणे प्रत्येक शिष्याचे कर्तव्य असते.''

**गुरू चरन बसे अब मन में। मैं सेऊं दम दम तन में।।**

आपण जेव्हा दोन्ही नेत्रांदरम्यान तीसऱ्या तिळावर लक्ष एकाग्र करून नामस्मरण करतो, तेव्हा तेथे कधी सतगुरूंचे स्वरूप प्रगट होते, तर कधी तेथून नाहीसे होते. ज्याप्रमाणे ट्रेनने प्रवास करीत असताना आपणांस असे भासते की, बाहेरील वृक्ष उलट्या दिशेने धावत आहेत. परंतु खरेतर वृक्ष त्यांच्या जागेवर स्थिर असतात, पळत तर ट्रेन असते! त्याचप्रमाणे **सतगुरूंचे तेजोमय चरण** आपल्या तीसऱ्या तिळावर उपस्थित असतात, आपले लक्ष कधी त्याकडे जाते, तर कधी आपले लक्ष तेथून दूर जाते.

अनेक प्रेमी अशीदेखील तक्रार करतात की आम्ही तेथपर्यंत पोहचतो परंतु मग ते तेजोमय चरण आमच्यापासून दुरावतात. काही प्रेमी सांगतात, प्रकाश तर प्रगट होतो, परंतु तो लवकरच नाहीसा होतो. असे का होते? तर त्यांचे अंतर्यात लक्ष एकाग्र झालेले नसते. जोपर्यंत लक्ष एकाग्र होत नाही, तीसऱ्या तिळावर जाऊन ते स्थिर होत नाही, तेव्हा सतगुरू स्वरूप कधी समोर येते, कधी नाहीसे होते. आपण जेव्हा सुर्य, चंद्र, तारे पार करतो, तेव्हा ते तेजोमय चरण आपल्या अंतर्यात दाखील होतात, मग तेच स्वरूप जंगलांत, पर्वतांवर अथवा वाळवंटात देखील सेवकाच्या सोबत असते.

## फिर प्रीत लगी घट धुन में। चढ़ पहुंची पहिली सुन में।

जेव्हा आपले लक्ष तीसऱ्या तिळावर एकाग्र होते, तेव्हा अंतर्यात जाऊन आपण सतगुरूंच्या तेजोमय स्वरूपाशी मधुर, प्रेमळ गोष्टी करतो. तेव्हा आत्म्यास अंतरामधून आनंद होतो, कारण आत्मा अंतरातूनच शब्दरूपी सतगुरूंशी गप्पागोष्टी करतो, त्यास खऱ्या आनंदाची जाणीव होते. जेव्हा तीसऱ्या तिळावर सतगुरूंशी मधुर गप्पा-गोष्टी होतात तेव्हा सतगुरू आत्म्यास अंतरातून उच्च पातळीवर नेतात, त्यानंतर मात्र आपली एकाग्रता भंग होत नाही व नामस्मरणाची लय देखील भंग होत नाही. त्यामुळे जेव्हा एकदा आपण अशाप्रकारे एकाग्र होतो, मग जागृत अवस्थेमध्ये वा सुप्त अवस्थेमध्ये आपण त्याच ठिकाणी स्थिर राहतो. कबीर साहेब सांगतात :

***सोए जागे रहे उताणे, कहे बीर हम वही ठिकाणे।***

## अब सील क्षमा मन छाई। गइ तपन काम दुखदाई।

स्वामीजी महाराज सांगतात,''आपणांस आपले मन रात्रं-दिवस एखाद्या हरणाप्रमाणे भरकटवते. शरीरात काम-अग्नी असतो ज्यामुळेच माणूस आपला मनुष्यधर्मच विसरतो. कामी मनुष्य बेशरम बनतो. त्यास शेजारी उभा असलेला मनुष्यदेखील दिसत नाही. काम-अग्नीचा पगडा इतका मजबूत असतो की,

मनुष्य आपले नातेसंबंधही विसरून जातो. अंतरामध्ये जेव्हा **सतगुरूंचे तेजोमय चरण** प्रगटतात, तेव्हा काम नाहीसे होऊन त्याची जागा शील घेते.

## फिर क्रोध लोभ भी भागे, अहंकार मोह सब त्यागे।

क्रोध हे क्षणभराकरीता आलेले वेडेपणच असते. तुम्ही क्रोधींची अवस्था पहा! ज्यांना क्रोध येतो त्याक्षणी त्यांना स्वत:सच कल्पना नसते की ते काय बोलत आहे? क्रोधी स्वत: क्रोधाग्नीमुळे संतप्त होतात व सोबत आजूबाजूच्या लोकांनाही ते संतप्त करतात. जेव्हा क्रोध नाहीसा होतो, तेव्हा त्याची जागा क्षमा घेते. मोह गेल्यावर तेथे विवेक येतो. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकाररूपी काळाच्या शक्ती नाहीशा होऊन, त्यांची जागा दयाल शक्ती घेतात.

प्रिय मित्रहो! या गोष्टी केवळ सांगण्यासाठी नाहीत, कारण काळाच्या या शक्ती आपल्या दररोजच्या जीवनामध्ये समोर येत असतात. या शक्तींवर ताबा मिळविणे हे आपल्या मावशीच्या घरी फिरावयास जाण्याइतके सोपे नाही. मोठमोठ्या ऋषींनी तपोभ्यास केला, त्यासाठी ते जंगल-पर्वतांवर गेले, परंतु तेथेही काम, क्रोधाने त्यांची पाठ सोडली नाही. जर आपण असे म्हटले की, बाहेर याबद्दल चार पुस्तकांचा अभ्यास करून, गुणी ज्ञानी बनून लोकांना हितोपदेश देऊन, आपली या अग्नींपासून सुटका करवून घेऊ, तर ती म्हणजे आपण स्वत:चीच केलेली फसवणूक आहे.

प्रियजनहों! आपण हठयोगाच्या मदतीने या स्थुल जगामध्ये, या शक्तीं पासून थोडीफार सुटका करवून घेतली तरीही जेव्हा आपण अंतर्यात सूक्ष्म दुनियेत जातो तेथे सुद्धा सूक्ष्म भोग आहेत. तेथे या सूक्ष्म भोगांचा खूपच मोठा प्रभाव असतो. दुर्वासा ऋषी स्वर्गापर्यंत, सूक्ष्म देशामध्ये जात असत. परंतु तेथे ते उर्वशी परीमागे भाळले, तिने त्यांना फसविले.

मी सांगत असतो की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची स्थूल गाठ आपल्या दोन्ही नेत्रांच्या मागच्या बाजूस, सूक्ष्म त्रिकुटीमध्ये आहे.



जोपर्यंत आपण पारब्रह्मामध्ये पोहचत नाही, आपल्या आत्म्यावरून स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीनही पडद्यांचे आवरण दूर सारत नाही, तोपर्यंत आपला या पाच डाकूंपासून बचाव होण्याचा प्रश्नच येत नाही.

**धुन पाँच शब्द घट जागी, मन हुआ सहज बैरागी।**

आता आपण प्रेमाने सांगता, ''या पाच काळाच्या शक्ती एक एक करून आपल्या अंतरातून निघू लागतात. काम सांगते की मी जाते, येथे मला टिकणे अशक्य आहे. जोपर्यंत घराचा मालक निद्रावस्थेत असतो तोपर्यंत घरामधून काय न्यावे व मागे काय बाकी सोडावे, हे या डाकूंच्या मर्जीवर अवलंबून असते. आपणांस कल्पना आहे की, जेव्हा डाकूंना एखाद्या घरामध्ये जाण्याची संधी मिळते, तेव्हा ते मागे काही सामान बाकी सोडतील का? जेव्हा घराचा मालक जागृत होतो, सावध होतो व धाडसाने त्यांस पळवून लावण्यासाठी आवेशात येतो तेव्हा मात्र ते डाकू तेथून पळून जातात.

आपल्या अंतरातून पाच डाकू पळून गेल्यानंतर अंतरामध्ये वरून येणारा ध्वनी आपण ऐकतो व आपल्या अंतरामध्ये वैराग्य निर्माण होते. हे वैराग्य केवळ जगास दाखविण्यासाठी नसते. काहींना कदाचित असे वाटते की अनेक लोक त्यांचे घरदार, पत्नी, मुले यांचा त्याग करून वैरागी बनतात, मग घरदार सोडून बाहेर जाऊन आपले शिष्य बनवतात व आश्रमांना काबूत करण्यासाठी भांडतात-झगडतात. बाहेर जाऊनदेखील प्रत्येक गोष्टींची गरज भासते. आपण ज्या वस्तुंचे वैराग्य करून कुटुंब त्यागून घर सोडलेले असते, पुन्हा त्याच वस्तुंसाठी बाहेर पडल्यानंतर भांडणे-मारामारी करतो.

प्रियजनहो! आमच्या प्रांतातील एक हल्लीचेच उदाहरण आहे. एक साधू पंजाबमधून त्याचे घरदार त्यागून आमच्या प्रांतात येऊन राहू लागला. तो गळ्यात केवळ एक गोणी घालून बसत असे, त्याने वैराग्यात कपडे घालणे देखील बंद केले. तो आपल्या हाताने मायेस स्पर्श करीत नसे. जर कोणी

त्यास माया देऊ इच्छित असे, त्यास तो सांगे की गोणीखाली ठेवा किंवा आपल्या एखाद्या सेवकास तिचा स्वीकार करण्यास सांगत असे.

बाबा सावन सिंहजी सांगत असत,''मायेस स्वत: स्पर्श केला नाही. परंतु गोणीखाली ठेवण्यास सांगितले वा शिष्यास स्वीकारण्यास सांगितले, आजार तर तोच राहिला. देण्या-घेण्याचा तोच प्रकार झाला.''

त्या साधुकडे खूप माया जमा झाली, मोठी इस्टेट बनली. त्या साधुचे दोन शिष्य होते. साधुने शरीर सोडल्यानंतर त्या दोन शिष्यांमध्ये त्या इष्टेटीवर वारसहक्क गाजवण्यासाठी भांडणे सुरू झाली. आजच्या घडीस त्या इस्टेटीवर सरकारने ताबा मिळवलेला आहे. प्रियजनहो! तो साधु गळ्यात गोणी घालून राहात असे व शिष्यांना देखील तोच उपदेश देत असे. परंतु तुम्हीच पहा! केवळ देखाव्यासाठी केलेले वैराग्य असे काही घडवते.

आपला आत्मा जेव्हा अंतरी शब्द ऐकतो तेव्हा मनामध्ये खरे वैराग्य उत्पन्न होते. मनास चविष्ट पदार्थांचे आकर्षण असते. जोपर्यंत मनास सर्वश्रेष्ठ, निर्भेळ चव मिळत नाही, तोपर्यंत ते या जगातील आंबट-गोड चवींचा त्याग करण्यास तयार होत नाही. आपण जर एखाद्या भिकाऱ्याकडून त्यास भिक्षा म्हणून मिळालेली वस्तू सोडण्यास सांगितली, तर ती वस्तू देण्यासाठी तो राजी नसतो परंतु त्याच्या हातात जर आपण डॉलर, पौंड वा नोटा ठेवल्यास त्यास काहीही न सांगता तो आपली मुठ ढिली करतो.

आपल्या मनाची अवस्थादेखील अशीच आहे. जोपर्यंत आपण यास सर्वश्रेष्ठ, निर्भेळ अशा 'शब्द-नामाची' त्यास चव देत नाही, तोपर्यंत ते सांसारिक रस व विषय-विकारांचा त्याग करण्यास राजी होत नाही.

**गुरु किरपा सूर उगाना। अब हुआ जगत बेगाना।**

गुरू बाह्य स्वरूपाने देखील कृपा करतात. ते आपणांस सत्संग ऐकवीतात, सत्संगात आपल्यातील कमतरता आणि अंतर्यात जाण्याचा मार्ग समजावतात.

आपण अंतरातील घंटेचा नाद ऐकून अंतर्यात पुढे जातो, सूर्य, चंद्रापर्यंत पोहचतो, तेव्हा हे जग परके वाटू लागते, आपले याबद्दलचे आकर्षण नष्ट होते. अशा रीतीने सतगुरू आपली अंतर्यामध्ये देखील मदत करतात.

**घट बैठी तारी लाई। बाहर की किरिया दूर बहाई।।**

जेव्हा सूर्य, चंद्र प्रकट होतात, तेव्हा आपली अंतर्यात समाधी लागते मग बाह्य कर्मकांडे आपण आपोआपच विसरून जातो. बुल्लेशाहजींनी त्यांच्या गुरूंसमोर गाऱ्हाणे मांडले की,''मला दररोज पाच वेळा नमाज पढण्याची, सवय आहे, मी दररोज मशिदीमध्ये जातो. आता मी तुम्ही दिलेल्या कलमाची (नामाची) साधना करू की नमाज पढू?''

ईनायतशाह म्हणाले,''हे बघ बांधवा! तू दररोज करीत असलेले कर्मकांड करीत रहा.'' संत-महात्मे कधी कोणावर कोणताही कायदा-नियम लागू करीत नाहीत. ते सांगतात, मी जी काही युक्ती तुम्हांस सांगितली आहे, त्याप्रमाणे तुम्ही करा आणि मग पहा की यामध्ये तुम्हास रस वाटतो का कर्मकांडामध्ये रस वाटतो? मग तुम्ही स्वतःच निर्णय कराल. बुल्लेशाहजींनी बाह्य कर्मकांडांबरोबर अंतर्यात कलमाची कमाई केली, तेव्हा त्यांना अंतर्यात रस आला. मग ते जेव्हा ईनायतशाहजींकडे गेले तेव्हा त्यांनी विचारले,''काय बांधवा! तू नमाज पढतोस? रोजे ठेवतोस?'' बुल्लेशाहजी म्हणतात :

***नमाज पढ़ा के तैं वल वेखा, मैंनू काबा भुल्ल गया ई।***

तुम्ही अंतर्यात इतके सुंदर आणि मोहक वाटता की, मी त्याचे वर्णन करू शकत नाही. आता तुम्हीच सांगा की मी नमाज पढू वा तुमच्याकडे पहात राहू? नमाजासाठी झुकून उभे राहिल्यावर तुमच्यावरील माझी नजर हटते. मी काबा विसरलो, मशिदीमध्ये जाणे तर माझ्या लक्षातच राहिले नाही, कारण माझ्यासाठी असली काबा तुम्हीच आहात.

***भट नमाजा चिक्कड़ रोजे कलमें दे सिर स्याही।***
***बुल्ले ने श्यो अंदरो पाया ते भुल्ली फिरे लुकाई।।***



## गुरु अद्भुत सुख दिखलाया। क्या महिमा जाय न गाया।।

सत्य हे आहे की, जोपर्यंत आपण स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तिन्ही पडदे दूर सारून पारब्रह्ममध्ये पोहचत नाही, तोपर्यंत आपणांस असली सुखाची आणि शांतीची कल्पना येत नाही. तसेच आपणांस सतगुरूंच्या महानतेची कदर कळत नाही. दहाव्या द्वारी पोहचल्यावरच आपणांस कल्पना येते की सतगुरू शक्ती काय आहे आणि ते आपणांस काय सुख देतात? तेथे गेल्यावरच लक्षात येते की, कशातऱ्हेने सतगुरू आत्म्यास अद्भुत सुख आणि शांती देतात? याठिकाणाच्या खाली असेपर्यंत आपल्या अंतरामध्ये कधी सतगुरूंसाठी प्रेम निर्माण होते तर कधी शुष्कता तयार होते. जर कोणी म्हणाले की, हे महात्मा चांगले आहेत तर आपला विश्वास बसतो. जर कोणी म्हणाले की, हे महात्मा चोर आहेत, तर आपला विश्वास नाहीसा होतो.

येथे पोहचलेला आत्मा असे म्हणतो की, मला सतगुरूंनी जी काही सुख-शांती दिली आहे, तिचे मी वर्णन करू शकत नाही. माझ्याकडे त्यांच्या महिमेचे वर्णन करू शकेल, अशी जिव्हा नाही. तेथे पोहचलेल्या आत्म्यांची अवस्था गुळ खाल्लेल्या एखाद्या मुक्या मनुष्याप्रमाणे असते. मुका गुळ खातो, परंतु त्याच्या चवीचे वर्णन मात्र करू शकत नाही. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

***कित मुख गुरु सलाहिए गुरु करण कारण समरथ।***

## जग जीव अभागी सारे। नर देही योंही हारे।।

तेथे पोहचल्यावर आत्म्याच्या अंतर्यात जगातील इतर जीवांकरीता वेदना निर्माण होते की, आम्ही भाग्यहीन जीव आहोत जे इथे पोहचू शकत नाही. परमात्म्याने मनुष्यजन्म तर त्याची भक्ती करण्यासाठी दिला आहे. अंतर्यात जाऊन त्या परमात्म्याची भक्ती करण्याऐवजी आपण दूर-दूरच्या तीर्थयात्रा करण्यासाठी बाहेर पडतो. कधी एका तिर्थावर तर कधी दुसऱ्या तीर्थावर आपण जातो.

मी स्वत: माझ्या जीवनात दूर-दूरच्या अनेक तीर्थयात्रा केल्या आहेत. मी निरनिराळ्या बऱ्याच तीर्थक्षेत्रांवर जात असे. बाबा बिशनदासजींची भेट झाल्यावर त्यांनी मला 'दोन-शब्दांचे' ज्ञान दिले. त्यांनी फक्त ज्ञानच दिले नाही तर माझ्याकडून कठोर तपश्चर्या करवून घेतली, ज्याच्या फलस्वरूप परमात्मा कृपालजींनी येऊन माझ्यावर कृपावर्षाव केला.

प्रियजनहो! मी सांगत असतो की बाबा बिशनदासजींनी माझ्याद्वारे घोर तपश्चर्या करवून घेत असताना त्यांनी सर्वप्रथम माझा आहार खूप कमी करविला. असे करत असताना मला खाण्यासाठी फक्त भाज्या देऊ लागले. पुढे तेही कमी करून थोडे तूप देऊ लागले. नंतर तर ते तूपही कमी केले आणि फक्त मिठाचे पाणी देऊ लागले. ही बाबा बिशनदासजींनी माझ्यावर केलेली अपार कृपा होती, दया होती.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''कुंभार मातीचे मडके बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये जेव्हा त्या मडक्यास बाहेरून थापे मारतो, परंतु सोबत त्याने मडक्याच्या आतमध्ये हातदेखील ठेवलेला असतो.'' मी सांगत असतो की संतमतामधील पहिले दोन टप्पे अतिशय अवघड असतात कारण या टप्प्यांवर इतके खास मौल्यवान जवहिरा समान रस नसतात, जे रस, सौंदर्य आणि शांती आपणांस पुढील टप्प्यांवर लाभते.

इतर जीवांकडे पाहून आत्म्याच्या अंतरात वेदना होतात की हे जीव किती अभागी आहेत? यांना घर-दार, मुला-बाळांचा त्याग करण्याची, कसलाही खर्च गरज नसतानाही, हे पारब्रह्ममध्ये पोहचून सुख-शांती का बरे प्राप्त करून घेत नाही? गुरूंची कृपा तर मोफतच मिळत असते.

**क्यों गुरु से प्रीत न करते। क्यों जम के किंकर रहते।।**

आपण या जगातील सामान, विषय-विकारांवर तसेच मान-मरतबावर किती प्रेम करतो? परंतु गुरूंवर प्रेम करण्यामध्येच आपण सुस्त होतो. गुरूंवर प्रेम करण्यासाठी काही खर्च करावा लागत नाही. प्रियजनहो! आरशास गरज नसते की कोणी त्यामध्ये डोकावून पहावे. याचप्रमाणे गुरूंना आपल्या प्रेमाची गरज नसते कारण ते त्यांच्या गुरूंच्या प्रेमामध्ये रममाण झालेले असतात. जेवढे प्रेम गुरू त्यांच्या गुरूंवर करतात, तेवढे प्रेम जोपर्यंत शिष्य करीत नाही, स्वत:स गुरूंमध्ये विलिन करीत नाही, स्वत:चा विसर त्यास पडत नाही, तोपर्यंत तो देखील खरे सुख, खरी शांती प्राप्त करू शकत नाही.

**मैं किस से कहूं सुनाई। फिर अपना मन समझाई।।**

संत कोणास समजावतील? कोणीही ऐकायला तयार नसतो उलट सर्व लाठ्या घेऊन तयार होतात की तुम्ही आम्हांला असा उपदेश का देता?

**तू गुरुमत दृढ़ कर भाई। अब छोड़ो तात पराई।।**

येथे पोहचलेला आत्मा अखेरीस स्वत:च्याच मनास समजावतो की आता तूच दृढ होऊन गुरूमताचा अंगिकार कर, लोकांची काळजी करणे सोडून दे. कारण चिंता सोबत घेऊनच आपण जन्मास येतो. प्रियजनहो! मनुष्यजन्म अतिशय मौल्यवान आहे, तो तुम्हांस वारंवार मिळणार नाही.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''जो भाग्यवान असतो, त्याचाच जन्म सत्संगीच्या घरामध्ये होतो. त्याहून तो अधिक भाग्यशाली असेल तर त्यास बालपणापासूनच परमात्म्याचे आकर्षण असते आणि त्याहूनही अधिक भाग्यशाली असल्यास त्यास तारुण्यावस्थेत नाम प्राप्त होते, तो परमात्म्याकडे वाटचाल करू लागतो. तारुण्यावस्थेत मनुष्य पाच-सहा तास किंवा आठ तासांपर्यंत कमरेचा मणका सरळ ठेऊन ध्यान-अभ्यास करू शकतो. वृद्धावस्थेमध्ये शरीरास वेदना होऊ लागतात, विचारशक्ती घटू लागते.''

**चल रह तू त्रिकुटी घाटी। चढ़ सुन्न शिखर की बाटी।।**

आता आपण प्रेमाने समजावता, ''तू त्रिकुटी, ब्रह्म, महासुन्न सोडून भंवर गुंफेचा आडपडदा बाजूस सारून अंतर्यात पुढे चल.''

**महासुन्न की तोड़ो टाटी। जा भँवरगुफा की हाटी।।**
**फिर सतपुरुष घर पाया। धुन बीना जाय बजाया।।**

स्वामीजी महाराज सांगतात की,''आत्मा जेव्हा महासुन्न, भंवरगुंफेचा आडपडदा दूर करतो, तेव्हा तो सतपुरुषाच्या देशामध्ये प्रवेश करतो. तेथे मनास पुंगीच्या आवाजाप्रमाणे कर्णमधुर स्वर ऐकू येतो. सर्व संतांनी या कर्णमधुर आवाजाचा उल्लेख केलेला आहे. संतांनी त्या स्वराची तुलना बाह्य जगातील वाद्याच्या स्वराशी जरी केली असेल, तरीही खरी तुलना ज्या स्वराशी होईल असे कोणतेही वाद्य या जगामध्ये नाही.''

**सुनी अलख अगम की बतियाँ। शशि सूर खरब जहाँ थकियाँ।।**

ज्यावेळी हिंदुस्थानावर इंग्रजांचे राज्य होते, त्यावेळी सर्वांना मोकळेपणाने बोलण्याची परवानगी होती. त्यामुळे स्वामीची महाराजांनी खूप मोकळेपणाने वरील वाक्ये उच्चारली आहेत. गुरू नानकदेवजी महाराज तसेच इतर दहा गुरूंच्या काळी मुघलांचे राज्य होते. त्यावेळी मोकळेपणाने बोलण्याची कोणाला परवानगी नव्हती.

मी नेहमी गुरू ग्रंथसाहेब मधील वाणी ऐकवीत असतो. त्यामध्ये कोणत्याही समाजाची निंदा–नालस्ती केलेली नाही, केवळ परमात्म्याचा महिमा वर्णिलेला आहे. काही सामाजिक लोकांनी मुघल राजांना भडकविले की गुरू ग्रंथसाहेबमध्ये वाईट लिहिलेले आहे. त्यामुळे पाच–सहा वेळा गुरू ग्रंथसाहेब मुघलांच्या दरबारात सादर केला गेला. खरेतर कोणत्याही संतांनी कुठल्याही समाजाची निंदा–नालस्ती केलेली नाही कारण संतच निंदा करू लागले, तर आपणांस निंदा करण्यापासून कोण थांबवेल?

स्वामीजी महाराज सांगत आहेत,''पुढे जाऊन आत्म्याने अगम–अलख स्वर ऐकले. आत्मा सांगतो की या जगात केवळ एकच सूर्य आहे. सतपुरुषाच्या दरबारात तर अरबो–खरबो सूर्यांच्या प्रकाशासमान तेज आहे.''

**पिया परसे राधास्वामी। कुछ कहूं न पुरुष अनामी।।**

अंतर्यात आत्मा जाऊन परमात्म्यास भेटली आहे. तेथे पोहचल्यावर आत्म्यास जी सुख–शांती लाभते, त्याचा अनुभव केवळ तेथे पोहचलेल्या इतर आत्म्यांनाच होऊ शकतो. या बाह्यजगातील कोणत्याही वस्तूचे उदाहरण त्या सुख–शांतीसाठी देता येत नाही.

**मेरी आरत सब से न्यारी। कोइ समझेगी पिया प्यारी।**

आरती करण्यासाठी थाळीमध्ये दिवे प्रज्वलीत करून ठेवले जातात. एखाद्या ईष्ट देवासमोर आपण ती थाळी फिरवतो. दोन–चार मिनिटे फिरवून झाल्यानंतर ती थाळी बाजूला ठेवली जाते. माझी आरती म्हणजे माझे

परमात्म्याशी मिलन आहे, मी परमात्म्यात एकरूप झालो आहे. जो गुरूमुख आत्मा तेथे पोहचतो तोच या आरतीचा अर्थ समजू शकतो. परमात्म्याशी एकरूप होऊन जाणे हीच खरी आरती आहे. येथे पोहचून धन्नाभक्त सांगतो:

***गोपाल तेरा आरता जो जन तुमरी भक्त करें दा तिनके काज सँवारता।***



**यह भेट अथाह बखाना। बिन सन्त न कोई जाना।।**

स्वामीची महाराज सांगत आहेत, ''मी जे काही रहस्य उलगडून सांगितले आहे, याची साक्ष केवळ संतच देऊ शकतात. गुरू नानक देवजी, कबीर साहेबजी, दादू साहेबजी, रविदासजी यांच्यासारखे परमगतीस प्राप्त झालेले संतच याची साक्ष देतील. सांसारिक लोकांना माहितच नाही की परमात्मा आपल्या अंतरात असून आपण त्यास अंतर्यात जाऊन कसे भेटावयाचे आहे? व परमात्म्यास भेटल्यावर किती शांती मिळते? कसला लाभ होतो?

## करमी जीव जग के अंधे। सब फँसे काल के फँदे।

आपण सांगता,''कर्मकांड करणारे लोक केवळ रीति-रिवाजच जाणतात. कर्मकांड करणे म्हणजे रवीने पाणी घुसळल्याप्रमाणे आहे. आपणांस कल्पना आहे की पाण्यात रवीने कितीही घुसळले तरी केवळ बुडबुडेच येतात. लोणी केवळ दूधापासून बनलेल्या दह्यात रवी घुसळल्यानेच प्राप्त होते.''

## उनसे नहिं कहना चाहिये। मन गूढ़ छिपाये रहिये।।

स्वामीजी महाराज सांगत आहे, ''तुम्ही विनाकारण मनमुखांना नाराज का करता? त्यांना काहीही सांगू नका. हे गुढ रहस्य त्यांच्यापासून लपवून ठेवा.'' गुरू नानकदेवजी महाराजदेखील सांगत आहेत:

***बिना ग्राहक गुण बेचिए तो गुण सहजो जाए।***
***गुण का ग्राहक जे मिले तो गुण लाख बिकाए।।***

अनेक प्रेमी लोकं माझ्याकडे येऊन सांगतात की आमचे पूर्वज पूर्वीपासूनच कर्मकांड करीत आले आहेत. आम्ही त्यांचा त्याग कसा करू शकतो? तुम्ही शांत चित्ताने विचार करू पहा! आपल्या पूर्वजांना कर्मकांडाबद्दल खरे ज्ञान नव्हते किंवा त्यांच्या पूर्वकर्मांअभावी त्यांना पूर्ण गुरू मिळाले नसतील तर आपण देखील त्याच मार्गाने जावे काय?

मी माझ्या वडिलांबद्दल नेहमी सांगत असतो की ते खूप कर्मठ कर्मकांडी होते. पहाटे उठून हातामध्ये गुटका घेऊन ते जपजी साहेब वाचत सोबत नोकरांना शिव्यादेखील देत. मी अनेकदा त्यांना विचारी की परमात्मा तुमचे जपजीसाहेबचे पठण स्वीकारेल की तुमच्या शिव्या मान्य करेल?

प्रियजनहो! हे ऐकून तुम्ही सर्वजण हसाल की पंजाबमध्ये माघ महिन्यामध्ये जर कोणाची म्हैस व्यायली तर त्यास अपशकून मानून लोकं ती म्हैस लगेच विकून टाकतात. याचप्रमाणे आमच्या घरी एक म्हैस होती. ती माघ विणार होणार होती. एक ब्राह्मण घरी आला व त्याने त्यावर एक माला देत उपाय

सांगितला की ही माळ फिरवीत तू दररोज जप करीत जा, तुझी म्हैस माघ महिन्याऐवजी पुढच्या महिन्यामध्ये व्याईल. माझे वडील त्यानुसार दररोज माला जपत राहीले. माघ, फाल्गुन, ज्येष्ठ आणि आषाढ हे महिनेदेखील निघून गेले परंतु म्हैस व्यायली नाही, याचे कारण म्हणजे म्हैस गर्भारिच नव्हती. एके दिवशी माझे वडील मला म्हणाले की,''चूकून मी माला जास्तवेळा तर जपली नाही ना?'' मी म्हटले, ''तुम्ही आता माला उलटी फिरवा.'' कर्मकांड करणाऱ्यांची अशी परिस्थिती असते. मी देखील माझ्या वडिलांप्रमोच करीत राहिलो असतो तर मी माझ्या सतगुरूंकडे गेलो नसतो.

**सुर्त शब्द कमाई करना। सुमिरन में तन मन देना।।**

स्वामीजी महाराज सांगत आहेत, ''सुरत-शब्दाचा अभ्यास सर्वोत्तम आहे. सतगुरूंनी दिलेले नामस्मरण आपण तन-मनाने करावे. नामस्मरण, ध्यान आणि अभ्यास ही मुक्तीची तीन साधने आहेत.''

**गुरु दर्शन बहुत निरखना। धुन अनहद नित्त परखना।।**
**सतसंग की चाहत रखना। जब डौल बने तब करना।।**

आता आपण प्रेमाने सांगता,''ज्याप्रमाणे चकोर पक्षी चंद्राकडे एकटक बघत असतो. त्याचप्रमाणे आपणही सतगुरूंचे दर्शन केले पाहिजे. जेव्हा कधी संधी मिळेल, तेव्हा सत्संगास जाण्याची मनिषा आपण हृदयामध्ये बाळगली पाहिजे. जर अशी मनिषा आपल्या अंत:करणात असेल, तर ती ईच्छापूर्ती करण्यासाठी आपण सत्संगास देखील जाऊ.''

**उपदेश किया यह टीका। राधास्वामी नाम मैं सीखा।।**

स्वामीजी महाराज सांगतात,''मी आपणांस सर्व ग्रंथांचा सारांश सांगितला आहे, ''शब्द-नामाच्या कमाईचे महत्त्व सांगितले आहे. आपण शब्द-नामाची कमाई करून आपले जीवन सफल करावयास हवे.''

***



# सावन दयालु ने रिमझिम लाई

परम संत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
मुंबई, महाराष्ट्र – ९ जानेवारी १९९३

***प्रेमी :*** प्रिय संतजी! दोन दिवसांपूर्वी एका प्रेमीने नवीन भजन गायले होते, जे नुकतेच संत–बाणी मासिकात छापले गेले आहे. तुम्ही या भजनाने अतिशय प्रभावित झाला होतात आणि या भजनासंदर्भात तुम्ही बरेच काही सांगू इच्छित होतात. परंतु त्यावेळी ध्यानाची वेळ झाल्याने तुम्ही काही सांगू शकला नाहीत. आज आपण या भजनासंदर्भामध्ये काही सांगू शकाल का?

**बाबाजी :** सर्वप्रथम मी परमात्मारूपी गुरू सावन–कृपालजींचे आभार मानतो ज्यांनी आम्हां गरीब आत्म्यांसाठी शांतीमय देशाचा त्याग करून मनुष्य देह धारण केला. जोपर्यंत आपण स्वत: शांती अनुभवत नाही तोपर्यंत त्या शांतीचे वर्णन करू शकत नाही. जो अनुभवतो तो असेच म्हणतो:

***महरम होय सो जाने साधो ऐसा देश हमारा।***

कबीर साहेब सांगतात, ''जो त्या शांतीमय देशात जातो तोच सांगू शकतो की, आम्ही कोणत्या बागेतील फळ आहोत, आमच्या अंतर्यात किती माधुर्य आहे आणि आम्ही कशाप्रकारे परमात्म्याच्या आदेशावरून तुमच्यासाठी या जगात आलो आहोत?'' मी माझ्या दयाळू गुरूंचे आभार मानतो ज्यांनी मला अंतरातून प्रेरणा देऊन माझ्याद्वारे त्यांनी हे भजन लिहून घेतले.

सुरुवातीला पप्पुस हे भजन समजून घेण्यात व त्याचे भाषांतर करण्यात खूप त्रास झाला. जेव्हा पप्पू वारंवार प्रश्न विचारीत असे तेव्हा मला खूप हसू येत असे, कारण हा स्वत: विवाहीत आहे. वैवाहिक जीवनामधून आपणांस बरेच काही शिकण्यास मिळते. गुरू–शिष्याचे प्रेमदेखील एखाद्या प्रेमी युगुला प्रमाणेच असते, ज्याचे रोपटे नि:संशयपणे गुरूच सेवकाच्या अंत:करणात लावतात. गुरूंना शिष्य दूर आहे की जवळ आहे, याचा काही फरक पडत

नाही. सेवक या प्रेमाच्या रोपट्याची मशागत करतो. तुम्ही त्यास ध्यान-अभ्यास किंवा मशागत, काहीही म्हणा. एखाद्या वस्तुची आपण वारंवार आठवण करीत राहिल्यास त्या वस्तुशी आपला मोह व प्रेम जडते. इतके प्रेम जडते की, आपल्याला सतत त्या वस्तुकडे पाहत राहवेसे वाटते व तरीही आपल्या नेत्रांची तहान भागत नाही.

कोणा महात्मांनी परमात्म्यावर प्रेम करण्याची तुलना वडिल आणि मुलाच्या नात्याशी केली आहे. या नात्यामध्ये वडिल आणि मुलास जोडणारे बंधन हे प्रेमाचेच असते. परंतु जास्तकरून महात्म्यांनी या नात्याची तुलना पती-पत्नीच्या नात्याशी केली आहे. पती-पत्नीच्या या नात्यामध्येदेखील त्यांना जोडणारे बंधन हे प्रेमाचेच असते. महाराज कृपाल सांगत असत, ''आयुष्यामध्ये विवाह एकदाच होतो. मृत्युनंतरच शरीराने एकमेकांपासून दूर जाणे हेच चांगले.'' घटस्फोटास महात्म्यांनी वाईटच म्हटले आहे मग ते महात्मा पूर्वेतील असोत वा पश्चिमेतील. घटस्फोटानंतर आपण जे काही करतो, त्यास महात्मा व्यभिचार संबोधतात. परमात्मा कृपाल पंचवीस वर्षे हेच सांगत की,''अध्यात्म हा लिखाणाचा विषय नसून तो प्रेमाचा विषय आहे कारण प्रेमाची देवाणघेवाण नेत्रांद्वारेच होते.'' तुम्ही एका भजनात म्हणता:

***ओ अक्ल के अंधे देख जरा तैनुं, सतगुरू दित्तियां अक्खियां ने।***

आपल्या अंतरातील नेत्रदेखील गुरूंचीच देणगी असते. प्रेमास ग्रहण करण्याची शक्तीदेखील गुरूंची देणगी असते. पप्पुचे प्रश्न ऐकून मी यासाठी हसायचो की वैवाहिक जीवनात पती-पत्नीस बंधक बनविणारे नेत्रच असतात.

हिंदुस्थानात खासकरून पंजाबमधील प्रांतात नुतन वर्षाची सुरुवात चैत्र महिन्याने होते. वैशाख, ज्येष्ठ, आषाढ हे महिने अतिशय गरमीचे असतात. परंतु श्रावण महिन्यात पाऊस पडतो. पावसात सर्वत्र पाण्याच्या थेंबांचा वर्षाव होत रहातो ज्यामुळे हवेत सर्वत्र गारवा पसरतो.

श्रावण महिन्यामध्ये महाराज सावन सिंहजींचा जन्म झाला. त्यांच्या आजोबांनी या महिन्याचे महत्त्व समोर ठेऊन यांचे नामकरणच सावन सिंह असे केले. त्या काळी आमच्या प्रदेशात अनेक वर्षांपासून दुष्काळ पडला होता. जनावरांना खाण्यासाठी चारा मिळत नव्हता. अन्नधान्यांच्या कमतरतेमुळे लोकं त्रासलेले होते. हे एक सत्य आहे की त्यावेळी लोकं चारा गोळा करून खात असत व धान्याप्रमाणे ते चारा सांभाळून ठेवत असत.

आज जी काही हिरवळ तुम्ही तेथे पाहता, तसे पूर्वी नव्हते. कारण त्यावेळी तेथे पाण्याचे कालवे नव्हते. आता कालवे असल्याने सर्व परिसर हिरवागार आहे. प्रियजनहो! महाराज सावन सिंहजींचे जेव्हा या जगामध्ये आगमन झाले. त्यावेळी या प्रांतामध्ये खूप पाऊस पडला, ज्यामुळे अन्नधान्याची आणि फळ-फळावळीची प्रचंड निर्मिती झाली. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीस अन्न आणि प्राण्यांना चारा मिळाला. त्या काळातील बेसत्संगी लोकंदेखील त्या वेळेची आठवण काढतात. त्या भजनाची टेक अशी आहे :

***सावन दयालु ने, रिमझिम लाई, तूं मौसम रंगीले च, आ के तां देख।***

पाऊस पडून गेल्यानंतर आकाशामध्ये अनेक प्रकारचे रंग दिसू लागतात, ज्यास सप्तरंगी इंद्रधनुष्य असेही म्हटले जाते. पंजाबी भाषेत त्यास 'माता की पींघ (झोपाळे)' असेदेखील म्हटले जाते. श्रावण महिन्यात पंजाब प्रांतातील मुली त्यांच्या माहेरी गाठभेट घेण्यासाठी येतात. ज्या दोन मैत्रिणींचे आपापसांमध्ये विशेष प्रेम असते, त्या दोघीजणी मिळून एका झोपाळ्यावर झोके घेतात. म्हणून असे म्हटले गेले :

***अम्बरां ते पींघा ने, सत-सत रंगियां, तू प्यारां दी पींघ, चढ़ा के तां देख।***

हे प्रिय सावन, जसे आकाशात मोहक सप्तरंगी पींघ (झोपाळे) उमटलेले आहेत, तुम्ही सुद्धा एकदा माझ्या आत्म्यासोबत, माझ्यासोबत झोपाळ्यावर झोके घेऊन तर पहा!

प्रियजनहो! जेव्हा गुरू–शिष्याचे एकमेकांवर प्रेम जडते, तेव्हा शिष्याची देखील इच्छा होते की, मी कोणत्या ना कोणत्याप्रकारे गुरूंच्या नामरूपी जहाजामध्ये बसून फेर–फटका मारावा, त्यांच्याबरोबर प्रेमाच्या झोपाळ्यावर खेळावे. शिष्याच्या हृदयात अशाप्रकारच्या इच्छा नेहमीच प्रकट होत असतात.

मी माझ्या जीवनातील घटना सांगत असतो की, महाराजजी अशा गोष्टींना राजी नसत. परंतु सेवकास सवय जडलेली असते, ज्यामुळे सेवकाचाही नाईलाज होतो. महाराजजी एकदा बाहेर फिरत होते. मी चोरून त्यांच्या चरणांची धूळ उचलून घेतली. महाराजजी म्हणाले, ''अशा गोष्टी मला पसंद नाहीत. तू आता या मातीलाच नमस्कार करीत राहशील.'' मला सुरुवातीपासूनच काव्य करण्याची सवय होती. मी प्रेमाने ओथंबलेल्या दोन लहानशा ओळी बोललो :

***तेरी सजरी पैर दा रेता, चुक चुक लावां हिक नूं।***
***प्यारेया तेरे पंज शब्दां ने मैनूं तारया।।***

आता मी खूप स्वत:वर आवर घातला आहे. माझी पूर्वीसारखी आता प्रकृती राहिलेली नाही. मी काव्यरचना थांबवावी असे केंट आणि पप्पुनेदेखील सूचीत केले आहे. हे सत्य आहे की, सेवक त्यास गुरूंनी दिलेल्या वस्तु खूप सांभाळून ठेवतो.

महाराज सावन सिंहजींना शेती करणे खूप प्रिय होते. ते एक यशस्वी शेतकरी होते. एकदा आम्ही सेवादार शेतात शेतकाम करीत होतो. ते सेवा करीत असलेल्या सेवादारांना सकाळी शेतात घेऊन स्वत:च्या हाताने चपात्या देत असत. ते तेथे आले असता त्यांना बसण्यासाठी तेथे खुर्ची नव्हती. माझ्या जवळ एक चादर होती, ती चादर त्यांना बसण्यासाठी खाली अंथरली. त्या चादरीवर ते बसून राहिले. ती चादर काही महाग नव्हती, एक साधारण कापड आहे. मी ती अतिशय आदरभावाने, प्रेमाने सांभाळून ठेवली.

जेव्हा त्यांचेच दुसरे स्वरूप परमात्मा कृपाल माझ्या घरी आले, त्यांना बसण्यासाठी मी तीच चादर खाली अंथरली. ती चादर पाहून महाराज कृपाल हसले. त्यांची रहस्ये तेच जाणतात की हे कोणते कापड आहे? त्यांनी ती चादर उचलून आपल्या मस्तकास लावली. ती चादर अजूनही प्रसादाप्रमाणे मी सांभाळून ठेवली आहे, कारण या चादरीवर परमात्म्याच्या दोन स्वरूपांनी स्पर्श केलेला आहे. प्रियजनहो! गुरूंच्या वस्तुंची कदर कोण करतो? ज्याच्यावर गुरूंची कृपा आहे, ज्यास गुरूंचे आकलन झाले आहे.

गुरू तेगबहादूर जेव्हा पंजाबहून पटना (बिहार) येथे जात होते, तेव्हा वाटेत काशी येथे ते थांबले, जेथे कबीर साहेबांनी नामाचा प्रचार केला होता. कबीर साहेबांनी ज्या फळीवर बसून विणकाम केले होते, ती फळी उचलून ते घेऊन गेले. काशी आणि पटना या दोहोंमध्ये खूप अंतर आहे. त्याकाळी ट्रेन, बस अशी प्रवासाची साधने उपलब्ध नव्हती. मार्गामध्ये सेवक महाराजजींना म्हणाले की, तुम्ही हे फळीचे ओझे का घेतले आहे? ते आमच्याकडे द्यावे. त्यावेळी गुरूसाहेब हसले आणि म्हणाले,''हे ओझे मलाच उचलावयास हवे, ही अशी वस्तु आहे, एकेकाळी ज्यावर बसून परमात्म्याने स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी कामधंदा केला होता.''अजूनही ती वस्तु शिखांनी पटना येथे सांभाळून ठेवली आहे.

***मैं पलकां च रख लां, छुपा के तैनूं, तू दिल वाले वेहड़े च, आ के तां देख।***

आपल्या नेत्रांवर पापण्या आहेत, ज्या सतत वर-खाली होत असतात. या पापण्या आपल्या नेत्रांच्या संरक्षणासाठी असतात. यांचा महिमा कबीर साहेबांनीदेखील वर्णिलेला आहे :

***जब आंवे तू आँख में आँख झाँप में लूं। न मैं देखूं और को न तुझे देखन दूं।।***

सेवक सतगुरूंसमोर हेच मागणे मागतो की, तू एकदा माझ्या अंतरामध्ये येऊन तर बघ! ना मी इतरांकडे पाहीन आणि ना तुला इतरांकडे पाहू देईन.

यावेळी मी जेव्हा केलगिरी येथे गेलो असता मला भेटण्यासाठी पती–पत्नीचे एक जोडपे आले. पती त्याच्या बाजूस माझे अधिक लक्ष आकर्षित करीत होता. पत्नीच्या ह्रदयामध्ये हे खटकले की, बाबाजींचे या मनुष्यावर अधिक प्रेम असून माझ्यावर कमी प्रेम आहे. तुम्हांस कल्पना आहे की जेव्हा एका ह्रदयाची दुसऱ्या ह्रदयाशी प्रेमाची तार जुडलेली असते, तेव्हाच असे घडते. ती बिचारी पुन्हा एकटी मला भेटण्यासाठी आली. ती म्हणाली, ''मला असे जाणवते की तुम्ही माझ्या पतीवर माझ्यापेक्षा अधिक प्रेम करता व माझ्यावर कमी करता.'' मी हसलो आणि म्हणालो, ''नाही! नाही! असे नाही.'' ते दांपत्य येथेदेखील बसलेले आहे.

अनेक पती–पत्नींमध्ये यावरून वाद–विवाद निर्माण होतात की तुझी नजर कोठे आहे? प्रियजनहो! जे एखाद्यास नेत्रांमध्ये लपवून ठेवतात. त्यास तेथून बाहेर येऊच देत नाहीत. ना पती बाहेर येऊ देत, ना पत्नी बाहेर येऊ देत. त्याचप्रमाणे ना गुरू शिष्यास नेत्रांमधून बाहेर येऊ देतात, ना शिष्य गुरूंना बाहेर पडू देतो. प्रियजनहो! हा तर प्रेमाचा खेळ आहे. हे गुरू–शिष्याच्या प्रेमाचे बंधन आहे.

मी जेव्हा केलगिरीपासून फार्म हाऊसकडे जाऊ लागलो, तेव्हा तोच प्रेमी माझी गाडी चालवत होता. मला त्याच्या सवयीची कल्पना होती. तो समोर पहाण्याऐवजी माझ्याकडे पाहू लागला. मी त्यास म्हणालो की, मला तुझी सवय माहित आहे. तू पुढे पहा नाहीतर तू कुठेतरी गाडी ठोकशील. मी त्यास माझ्याकडे पाहण्यास मनाई केली.

***कोयलां दे गीतां दी, सुर नूं समझ के, तूं इक गीत प्यारां दा, गा के तां देख।***

कोकिळेचे स्वर अतिशय मधुर समजले जातात. ज्या गायकाचा आवाज अधिक मधुर, रसाळ असतो, त्या गायकास त्या विभागाची कोकीळ संबोधून त्यास गौरविले जाते. सेवक म्हणतो, ''तू कोकिळेच्या गाण्याच्या सुरांना समजून घे. तू माझ्यासोबत प्रेमगीत गाऊन तर पहा.''

मी सांगत असतो की, मला भजन गाण्याची खूप आवड होती. माझा आवाजदेखील खूप रसाळ होता. अनेकदा माझे हृदय जेव्हा प्रेमाने ओथंबलेले असे तेव्हा मी भजन म्हणत असताना मी माझ्या सत्‌गुरूंच्या नेत्रांमधून अश्रु वाहवित असे. महाराजजी प्रत्येक ओळीवर याप्रमाणे डोके हालवित किंवा बोटाने इशारा करीत की हे ठीक आहे.

सुरुवाती–सुरुवातीला जेव्हा अमेरिकेस गेलो, तेव्हा अनेक भजने मी म्हटली. मला अमेरिकेतील अनेक गायक कलाकार भेटले. ते म्हणाले की, पंजाबमधून स्वत:स कोकीळा म्हणून गौरवून घेणारे अनेक गायक कलाकार येथे येत असतात परंतु ते सर्वजण नाकातूनच गातात, परंतु तुमचा स्वर मात्र हृदयामधून येत आहे. मी शेवटचे भजन न्यूयॉर्क येथे म्हटले होते. त्यानंतर माझ्या कंठाने भजन म्हणण्याचे थांबविलेच. आता मी हे भजन लिहिले आहे. या भजनाचा गायक गुरूमेल सिंह असून त्यास पप्पु साथ देत आहे.

***खुशी स्वर्गां दी, मिल जाऊ ऐत्थे, तूं जुल्फां दी छां हेठ, आ के तां देख।***

आपण म्हणतो की, गुरू केवळ भाग्यात असेल तरच भेटतात. माझा असा देखील अनुभव आहे की, गुरूस शिष्यदेखील भाग्यानेच भेटतो. म्हणूनच शिष्य, गुरूंना अतिशय प्रेमाने प्रश्न विचारतो,''लोकं स्वर्ग प्राप्तीसाठी स्वत:चे सर्वस्व त्यागतात, आपले प्राण देतात, घरादार दान करतात. खरेतर त्यांनी स्वर्ग पाहिलेलादेखील नसतो.'' सेवक पुढे गुरूंस म्हणतो की, तू माझ्या केसांच्या सावलीखाली येऊन तर पहा! तुम्हाला आनंद प्राप्त होईल.

सेवक जेव्हा गुरूंच्या आदेशाचे पालन करीत ध्यान–अभ्यास करतो, तेव्हा त्या शिष्यास पाहून गुरूंना स्वर्गातदेखील प्राप्त होऊ शकत नाही इतका आनंद होतो. तेव्हा सतगुरू म्हणतात,''परमेश्वराचे आभार, एक तरी शिष्य उत्तीर्ण झाला.'' ज्या ठिकाणी मी ध्यान–अभ्यास केला होता, अनेक प्रेमींनी ते ठिकाण पाहिले आहे, त्या ठिकाणासंदर्भात मासिकात खूप काही छापलेही गेले आहे. तेथे हेच लिहून एक पाटी ठेवली आहे:

***चलो सई यो रण वेखण चलिए जित्थे आशिक सूली चढ़ दे।***
***चढ़दे चढ़दे करण कलोलां ते मौतों मूल न डरदे।।***

मी माझ्या गुरूंसमोर देखील असे काही म्हणत असे :

***आशिक अजायब को समझे न कोई, जिवें देख देख के तपना।***
***लै के अग्ग पराए घर दी जिस फूँक लिया घर अपना।।***

त्यावेळी माझ्या कुटुंबातील लोक हेच म्हणत की, कृपालजींनी याच्यावर जादू केली आहे. एकदा माझे थोरले बंधु दोन नातेवाईकांसोबत माझ्याकडे येऊन म्हणाले की, चल तुला अमृतसर येथे नेऊन विजेचे झटके देऊया. मी त्यांना म्हणालो,''होय! जादूचा परिणाम माझ्या डोक्यावर होऊन ती बोलत आहे, परंतु तुम्हाला त्या जादूचे ज्ञान नाही.'' प्रियजनहो! अशी परिस्थिती का झाली होती? परमात्मा कृपालजींनी प्रेमरूपी अग्नी मला दिला होता. तो अग्नी प्रज्वलीत करण्यासाठी काडी लावताना मला कल्पना नव्हती की त्या अग्नीचा प्रभाव माझ्यावर काय पडेल? बुल्लेशाह सांगतात :

***काजी छोड़ कजाई जावण, जद इश्क तमाचा लावे।***

भलेही बुल्लेशाह मशिदीतील मुल्ला होते व त्यांना मानणारे अनेक लोकं होती, परंतु जेव्हा त्यांच्या अंतरात गुरुप्रेमाचा अग्नी प्रज्वलित झाला, तेव्हा ते सर्वकाही सोडून यामार्गी लागले. अशा प्रेमीस त्याचे नातेवाईक, बंधु-भगिनी आपुलकी दर्शवितात व घरचे कामकाज करण्यासाठी समजावतात. त्यांना असे वाटते की, हा अज्ञानी असून यास जगाचा समज नाही.

माझ्या त्या थोरल्या बंधुंची अंतिम वेळ जवळ आली, तेव्हा ते म्हणू लागले की, चार खाटीक मला नेण्यासाठी आले आहेत. परंतु थोड्या वेळानंतर म्हणू लागला त्यांच्यापासून माझी सुटका महान कृपालजींनी केली आहे. मला जेव्हा हे सर्व माझे इतर बंधु सांगू लागले, तेव्हा मी हसून म्हटले ''तरीदेखील सत्गुरू कृपा करतात.'' त्यांच्या मृत्युनंतर माझ्या कुटुंबातील लोकांनी नामदान घेतले आणि सत्संगासदेखील येऊ लागले.

***मैं भर-भर नैणा दे, जाम पिला दूं, तूं इक वारी नजरां, मिला के तां देख।***

प्रियजनहो, गुरू शिष्यास प्रेमरस देतात, तर शिष्यही गुरूंना प्रेमरस देतो. शिष्य जर गुरूंच्या प्रेमामध्ये गुंतला असेल. तर त्याच्या करोडोपट अधिक गुरू शिष्याच्या प्रेमामध्ये गुंततात. गुरू अर्जुनदेवजी सांगतात :

***नैण महंडे तरसदे कद पै सी दीदार।***

भाई नंदलाल गुरू गोविंद सिंहजी महाराजांना सांगतात :

***तेरी ईक नजर है मेरी जिंदगी का सवाल है।***

गुरू अर्जुनदेवजी महाराज म्हणतात :

***नैंण न देखे साध से नैंण मुंद घालिए।***

अशा नेत्रांना कायमस्वरूपी बंद करावयास हवे, ज्या नेत्रांच्या नशीबामध्ये सत्गुरूंचे दर्शन नाही.

***मैं जीवन वी सारा तेरे, नाम लिखा दू, तू एक वारी मेरे नाल, ला के तां देख।***

जेव्हा शिष्याच्या अंतरामध्ये गुरूंप्रती खरे प्रेम जागृत होते. तेव्हा तो शिष्य त्याचे तन, मन, धन सर्वकाही गुरूंचेच आहे असे मानू लागतो. गुरु रामदासजी महाराज सांगतात :

***माता पिता सुत इस्तरी सब हूं ते प्यारा।***

आता तुम्ही मला माझ्या आई-वडील, मुलगा-मुलगी, पत्नी या सर्वांपेक्षा अधिक प्रिय वाटू लागला आहात. सर्वांची समजावण्याची आपापली पद्धती असते. महाराज कृपाल सांगत असत, ''ज्या पाईपास बरीच छिद्रे असतील, त्या पाईपातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा दाब कमी असेल. परंतु त्या पाईपाची इतर सर्व छिद्रे बंद केल्यास, त्यातून पाणी खूप दाबाने बाहेर पडेल.'' त्याचप्रमाणे आपण इतर सर्व गोष्टींवरून आपले प्रेम दूर करून केवळ गुरूंवर प्रेम केल्यास ते प्रेम खूप जबरदस्तपणे उफाळून बाहेर पडेल. म्हणूनच सेवक येथे म्हणतो की, तू फक्त एकदा प्रेम करून पहा! मी माझ्या सर्व आयुष्यभर तुझ्या आधीन राहीन.''



मी सांगत असतो की, जेव्हा या वस्तुचा मी शोध घेत होतो, त्यावेळी मला काहीच भान नव्हते. मी केवळ हेच म्हणत असे की, माझे काही तरी हरवले आहे, मला ते कधी सापडेल? मी जेव्हा थोडा मोठा झालो व शिख इतिहासाबद्दल ऐकू लागलो तेव्हा माझ्या हृदयात विचार आला की, सतगुरूंच्या चरणी बसणारे लोकं किती भाग्यशाली असतील? मला जर सतगुरू भेटले तर माझे खूप उच्च भाग्य असेल. मला सतगुरू भेटतील काय?

प्रियजनहो! माझी बालपणापासून तशी इच्छा होती, माझ्या प्रेमाची धार केवळ एकाच दिशेने वाहत होती. म्हणून सेवक म्हणत आहे, ''तू केवळ एकदाच माझ्यावर प्रेम करून पहा! मी माझ्या हाता-पायांचे सर्व अंगठे स्टँप-पेपरवर उमटवून माझे संपूर्ण जीवन तुझ्या नावे रजिस्टर करून देईन.'' आजकालची मला कल्पना नाही, परंतु त्यावेळी हिंदुस्थानमध्ये आर्मीचा कायदा लागू होता. जेव्हा कोणी आर्मीत भरती होत असे, तेव्हा त्याच्या दोन्ही हातांचे ठसे कागदावर उमटवले जात आणि त्यास सांगितले जाई, ''शत्रूवर हल्ला करण्यासाठी माझे अधिकारी मला कोरड्या जमिनी मार्गाने पाठवोत वा समुद्रीमार्गाने पाठवोत, मी नक्कीच जाईन. मग भले त्यासाठी मला माझा जीव गमवावा लागला तरी चालेल!

***अमृत जल अज, अम्बरा चों बरसे, तूं इक वारी रीझ, लगा के तां देख।***

वरून प्रेमाच्या थेंबांचा वर्षाव होत आहे. तू एक तरी प्रेमाचा घोट पिऊन बघ! सतगुरूंच्या प्रेमामध्ये रस, माधुर्य असते, जे सेवकाचे आयुष्यच बदलून टाकतात. प्रियजनहो! शिष्याच्या प्रेमामध्येही माधुर्य असते. सतगुरू आणि शिष्याचे नाते अतिशय गहन असते. जेथे आई–वडील, बंधु–भगिनी कोणीही मदत करत नाही. सतगुरू तेथेही येऊन शिष्यास मदत करतात.

***सावन महिने दी, मस्ती च आ के, तूं नजरा दे तीर, चला के तां देख।***

मोराच्या नेत्रांमधून जेव्हा प्रेमाचे अश्रू गळून पडतात व ते अश्रू जेव्हा लांडोर प्राशन करते, तेव्हा तिला पिल्ले होतात. सेवक सांगत आहे की तू एकदा श्रावण महिन्याच्या धुंदीत येऊन माझ्या दिशेने नजरेचे बाण मारून तर बघ. माझी छाती तुझ्यासमोर आहे, माझे सर्वस्व तुझेच आहे.

***दाम बिना अजायब, हो गया तेरा, तूं एक वारी मैनूं, अजमा के तां देख।***

गुरू सेवकांकडून केवळ ध्यान–अभ्यासाचीच अपेक्षा ठेवतात. गुरू कधीही म्हणत नाहीत की तुम्ही माझ्यासाठी भेट वस्तू घेऊन या. ते म्हणतात तुम्ही माझ्यासाठी फक्त ध्यान–अभ्यास करून आणा. तेवढीच ते अपेक्षा ठेवतात. म्हणूनच अजायब म्हणतो, ''मी विनामुल्य तुझा झालेलो आहे.'' शिष्यदेखील काही मूल्य घेत नाही. तो गुरूंस म्हणत नाही की तू माझा आजार, बेरोजगारी दूर कर कारण त्यास कल्पना असते की जे काही होत आहे, ते माझ्या गुरूंच्या आज्ञेवरूनच होत आहे. एखाद्याने नोकरी केल्यानंतर पगाराची मागणी करावी, त्याप्रमाणे जर सेवक गुरूंकडून काही मागणी करू लागला तर ते प्रेम नाही तो केवळ स्वार्थ आहे. कबीर साहेब सांगतात:

***गुरु लोभी सिख लालची दोनो खेलें दाव।***

गुरू जर सेवकाच्या धनाचा वापर करून स्वत:चा उदरनिर्वाह करीत असेल, तर त्या गुरूस कबीर साहेब लोभी असे संबोधतात. शिष्यास वाटते की, माझी लालच पूर्ण व्हावी. ते दोघेही आपआपला डाव खेळत असतात.

पूर्ण संत–महात्मा त्यांच्या सेवकांकडून केवळ ध्यान–अभ्यासाची अपेक्षा ठेवतात. तसेच खरा सेवकदेखील असे कधीच म्हणत नाही की माझे सतगुरूंनी अमुक–अमुक काम केले नाही. आपल्या मात्र हजारो तक्रारी आहेत की गुरूंनी माझा आजार बरा केला नाही, बेरोजगारी दूर केली नाही. जर आपली एखादी फोडी जरी बरी झाली नाही, तर आपण म्हणतो गुरूंना सोडून द्यावे. आता आपण जरा विचार करून पहा! हे स्वार्थाचे प्रेम आहे.

अजायब म्हणत आहे, ''मी विनामूल्य तुझा झालो आहे, तू एकदा तरी मला अजमावून पाहा.'' प्रियजनहो, गुरू–शिष्याची गोष्ट कधीच संपत नाही. तुम्हांस असे वाटत असेल की यांनी हे सर्व विदीत करून गोष्ट संपवली आहे.

महाराज सावन सिंहजींनी पंचेचाळीस वर्षे त्यांच्या गुरूंच्या आणि परमात्मा कृपालजींनी पंचवीस वर्षे त्यांच्या गुरूंच्या गोष्टी विदीत केल्या. तसेच गुरू नानक देवजींपासून दहाही गुरूंनी आप–आपल्या गुरूंच्या गोष्टी सांगितल्या, मोठ–मोठे ग्रंथ लिहिले, परंतु त्या गोष्टी काही संपल्या नाहीत. माझ्या हृदयात गुरूंबद्दल सांगण्यासारखे खूप काही आहे. मी त्यांच्या महिमा काय वर्णन करू? ते सर्व कर्ते–करविते आहेत, समर्थ आहेत. आजदेखील ते आपले संरक्षण करीत आहेत.

आमच्या प्रांतातील एक सरदार कॅलिफोर्नियाला गेला होता. तो नामधारी नव्हता. तो एक पश्चिमी बंधुसोबत शम्स आश्रम सनफ्रॅन्सिस्को येथे गेला. त्याने तेथील प्रेमींना हेच भजन म्हणताना ऐकले. तो हिंदुस्थानात परतला व मला भेटावयास आला. तो म्हणाला की, मला एका पश्चिमी बंधुने माहिती दिली. मी तेथे आश्रमात स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले की लोक परमात्मा कृपालजींचे किती गुणगान करीत आहेत, त्यांच्या अंतरात किती प्रेम आहे.

गुरू–शिष्याचे प्रेम कधीच संपत नाही, ते उसळी मारून बाहेर पडते. जेवढे प्रेम बाहेर काढाल, त्याहूनही अधिक ते बाहेर येते.

***

# अनमोल वचन

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान–अभ्यासाच्या कार्यक्रमा प्रारंभी संगतसाठी एक महत्वपूर्ण संदेश, मुंबई, महाराष्ट्र – १७ जानेवारी, १९८०

सतगुरु प्यारे मेरी, जिंदगी सवार दे,
कर्मां दे मारे तेरे, दर ते पुकार दे, (२)

१. तेरे ते गुरुजी मेरा, राई रत्ती जोर ना,
तेरे बाजों दुनिया ते, मेरा कोई होर ना, (२) सतगुरु प्यारे मेरी...

२. शरण मैं तेरी आया, मैनूं ठुकराईं ना,
दु:ख मैं बथेरे पाऐ, होर तड़फाई ना, (२) सतगुरु प्यारे मेरी...

३. दुखां नाल तपया तूं, दिल मेरा ठार दे,
कर्मां दे मारे तेरे, दर ते पुकार दे, (२) सतगुरु प्यारे मेरी...

बंधुंनों! खूप छान संधी आपणांस लाभली आहे. मनुष्य जन्म सच्चखंडास पोहचण्याची शेवटची पायरी आहे. आपण जर प्रयत्न केला, तर आपल्या स्वगृही म्हणजेच सच्चखंडास नक्की पोहचू शकतो. परमात्मा जेव्हा आपल्यावर कृपा करतो, तेव्हा आपणांस प्रेरीत करून त्याच्या प्रिय संत–महात्म्यांच्या सान्निध्यात आणतो. परमात्मा प्रिय संत–महात्मे जेव्हा आपल्यावर कृपा करतात, तेव्हा ते आपले लक्ष शब्द–नामाशी जोडतात. त्यामुळे आपण संत–सतगुरूंच्या मांडीवर बसून आपली अध्यात्मिक उन्नती करीत असतो.

बाहेरील कोणत्याही प्रकारच्या आवाजावर तुम्ही लक्ष देऊ नका. जगातील प्रत्येक व्यक्ती आप–आपल्या कामात व्यग्र आहे, तसेच आपण आपल्या कामामध्ये मग्न व्हावे. मनास बाहेर भटकू देऊ नका, त्यास तुमच्या तीसऱ्या तिळावर एकाग्र करा. मनास शांत करा, कारण शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास ओझे न समजता, ते प्रेमपूर्वक करा. बंधुंनो! तुम्ही आता ध्यान–अभ्यासासाठी बसा.

***

# धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान व मुंबई येथील कार्यक्रमांची माहीती



## सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कायक्रम

**२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१५**

**२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१५**

**२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१५**

## मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

**६ जानेवारी ते १० जानेवारी २०१६**